(1)

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला
जिल्हा सिंधुदुर्ग

सन २०२५-२०२६
भांडार - विभाग

**विषय- उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला**
जिल्हा सिंधुदुर्ग येथील आहार पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविणे.

(१)जाहिर सूचना दि. ०७/०४/२०२६
(२)अंतिम दिनांक. १५/०४/२०२६ सायं०५.००वा. पर्यंत.
(३)दर पत्रके उघडणेचा दि. १६/०४/२०२६ ११.३०

Scanned with OKEN Scanner

# उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला

| | | |
|---|---|---|
| रुग्णालय दूरध्वनी क्र.:<br>कार्यालय दूरध्वनी क्र.:<br>आहरण व संवितरण क्र. : | 02366262235<br>1506012537 | उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला<br>तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग(416 520)<br>ई-मेल : rh_Vengurla@yahoo.com |
| *आरोग्य सेवा* | जा.क्र./उजिरुवें/आहार/दरपत्रक/ ३८९ /२०२६ | |
| | दिनांक : ०७.०४.२०२६ | |

## दरपत्रक सुचना

उपजिल्हा रुग्णालय शिरोडा येथे खालील नमुद केलेल्या बाबींचे सन २०26 . 27 या आर्थिक वर्षाकरिता रुग्णलयातील रुग्णांना आहार पुरवठा करण्याकरीता खरेदी करण्याकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदरील आहार पुरवठा कालावधी हा ३१ मार्च २०27 या पर्यंत करावयाचा आहे. अथवा रज्यस्थरावरुन किंवा जिल्हा स्थरावरुन दरपत्रक कार्यरत राहिल. सदर सर्व करासह समावेशक दरपत्रक या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहे. सदर सर्व करासह समावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर दिनांक १५ .04.२०26 सायं.05-00 पर्यंत वाजे पर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करणे.

## प्रस्तावित प्रमाणित आहार
## प्रवर्ग- प्रौढ रुग्ण (पुरुष,स्त्री)

| खाद्यपदार्थाचे नाव | पुरुष प्रमाण (ग्रॅम/मिली) | स्त्री प्रमाण (ग्रॅम/मिली) | | |
|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण स्त्री | गर्भवती स्त्री (अतरिक्त) | स्तनदा स्त्री (अतिरिक्त) |
| तृणधान्य | २७५ | २०० | | |
| गहुपीठ | १६० | ११० | +२५ | +५० |
| तांदुळ | ७० | ६० | | |
| पोहे/रवा/सोजी | ४५ | ३० | | |
| डाळ/उसळ | ८० | ६० | | +२० |
| डाळ | ५० | ४० | | |
| उसळ | ३० | २० | | |
| हिरवी पालेभाजी | १०० | १०० | | |
| फळभाजी | २०० | २०० | | |
| कंदभाजी | १०० | १०० | | |
| मोसमी फळे | १ नग(१००ग्रॅम) | १ नग(१००ग्रॅम) | +१नग(१००ग्रॅम) | +१नग(१००ग्रॅम) |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दुध | ३००मिली | ३००मिली | + १०० मिली | + १०० मिली |
| साखर/गुळ | २० | २० | + ५ | + १० |
| खाद्र्य तेल | २५ | १५ | + ५ | + १० |
| मसाला साहित्य | १० | १० | | |
| मीठ | ५ | ५ | | |
| तेलबिया | ३० | ३० | + १० | + १० |
| चहापत्ती | ५ | ५ | | |
| अंडी/उसळ | | | + २ नग/२० ग्रॅम | + २ नग/२५ ग्रॅम |
| प्रथिने (ग्रॅम) | ६७.२ | ५८.० | + २२.० | + १७.० |
| उष्मांक(किलोकॅलरी) | २१३० | १६९० | + ३५० | + ६०० |

टिप:

१) मांसाहाराकरिता ७५ ग्रॅम मांस/ मासे/अंडी आठवड्यातून दोन वेळा दुपारच्या जेवणातील डाळी ऐवजी देता येईल.

२) उच्चरक्तदाबाच्या रुग्णांसाठी वैद्यकीय सल्ल्यानुसार मीठाचे प्रमाण ठरवावे. (५ ग्रॅम मीठात २ ग्रॅम सोडीयम असते)

३) गर्भवती स्त्री, स्तनदा माता, अस्थीरोगांचे ग्रस्त तसेच शस्त्रक्रियेसाठी भरती झालेले पण शस्त्रक्रिया न झालेल्या रुग्णांकरिता वरीलप्रमाणे आहार देता येईल.

४)डाळी उसळी यामध्ये सर्व प्रकारचे कडधान्य मुग, मटकी, चवळी, हरभरा, वाटाणा, मसुर तसेच डाळींमध्ये तुर, चणा, सालीची मुगडाळ, उडीद, मसुर यासर्व डाळींचा समावेश असावा.

५) प्रौढ रुग्णांकरिता नवीन मानकांप्रमाणे साधारण काम करणारी पुरुष / स्त्री यांचा आहार देण्यात आला आहे.

६) गर्भवती स्त्री व स्तनदा माता यांना गुळ शेंगदाण्याचा लाडू ( ५० ग्रॅम) अतिरिक्त स्वरुपात देण्यात यावा.

दरपत्रके सिलबंद लखोटयात दिनांक १५/04/२०26 सायं.०५.०० वाजेपर्यंत वैद्यकिय अधिक्षक. यांचे कार्यालयिन टपालात आणून देणेची आहेत. सदर दरपत्रके दिनांक. १६/०४/२०२६ रोजी साकाळी.११.३० वाजता सहभागी मक्तेदारांचे

उपस्थितीत अथवा मक्तेदार उपस्थीत न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थीतीमध्ये उघडण्यात येतील. संबंधित मक्तेदारांनी

दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणा.या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी .

Medical Superintendent Cl. 1
Sub. District Hospital, Vengurla.

Scanned with OKEN Scanner

# आहाराचे दैनंदिन वेळापत्रक

## प्रौढ , स्त्री व पुरुष रुग्णांसाठी प्रति ताट आहार

| अ.क्र | वेळापत्रक | आहारपुरवठा | पुरुष प्रमाण (ग्रॅम/मिली) | स्त्री प्रमाण (मिली/ग्रॅम) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण स्त्री | गर्भवती स्त्री | स्तनदा स्त्री |
| १ | सकाळी - ६. ०० वा | चहा (१५० मिली) | दूध - २५ मिली , साखर - ५ ग्रॅम, चहापत्ती - २.५ ग्रॅम | दूध - २५ मिली , साखर - ५ ग्रॅम, चहापत्ती - २. ५ ग्रॅम | | |
| २ | सकाळी - ९. ०० वा नाश्ता | ब्रेड/रवा/पोहे/सोजी | १०० ग्रॅम | १०० ग्रॅम | | |
| | | उसळ | उसळ - २० ग्रॅम, कंदभाजी - ५० ग्रॅम, तेल - ५ ग्रॅम | उसळ - २० ग्रॅम, कंदभाजी - ५० ग्रॅम, तेल - ५ ग्रॅम | | |
| | | दूध | दूध -३०० मिली , साखर - १० ग्रॅम | दूध -३०० मिली , साखर - १० ग्रॅम | + २०० मिली | + २०० मिली |
| | | फळ | १ नग (१०० ग्रॅम) | १ नग (१०० ग्रॅम) | २ नग (१०० ग्रॅम) | २ नग (१०० ग्रॅम) |
| | | अंडी/उसळ | | | अंडी १ नग, उसळ - २० ग्रॅम | |
| ३ | दुपारी - १२. ०० वा जेवण | पोळी | ३ पोळया - १०० ग्रॅम | २ पोळया - ७५ ग्रॅम | | + १ पोळी - २५ ग्रॅम |
| | | भात | तांदुळ - ५० ग्रॅम | तांदुळ - ५० ग्रॅम | | |

Medical Superintendent Cl. 1
Sub. District Hospital, Vengurla.

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वरण | डाळ - ४० ग्रॅम, तेल - २.५ ग्रॅम | डाळ - २० ग्रॅम, तेल - २.५ ग्रॅम | | |
| | | भाजी | फळभाजी - २०० ग्रॅम, कंदभाजी - ५० ग्रॅम, तेल - ५ ग्रॅम | फळभाजी - २००ग्रॅम, कंदभाजी - ५० ग्रॅम, तेल - ५ ग्रॅम | | |
| | | सलाद | कंदभाजी - २५ ग्रॅम | कंदभाजी - २५ ग्रॅम | | |
| ४ | दुपारी - ३. ०० वा | चहा (१०० मिली) | दूध - २५ मिली , साखर - ५ ग्रॅम, चहापत्ती - २.५ ग्रॅम | दूध - २५ मिली , साखर - ५ ग्रॅम, चहापत्ती - २. ५ ग्रॅम | + १ फळ नग | + १ फळ नग |
| | | अंडी/उसळ | | | अंडी १ नग, उसळ - २० ग्रॅम | अंडी १ नग, उसळ - २० ग्रॅम |
| ५ | रात्री - ७. ०० वा | पोळी | ३ पोळया - १०० ग्रॅम | २ पोळया - ७५ ग्रॅम | | + १ पोळी - २५ ग्रॅम |
| | | भात | तांदुळ - ५० ग्रॅम | तांदुळ - ५० ग्रॅम | | |
| | | डाळभाजी | डाळ - ३०० ग्रॅम, पालेभाजी - १०० ग्रॅम, तेल - ७.५ ग्रॅम | डाळ - ३५ ग्रॅम, पालेभाजी - १०० ग्रॅम,तेल - ७.५ ग्रॅम | | |
| | | सलाद | कंदभाजी - २५ ग्रॅम | कंदभाजी - २५ ग्रॅम | | |
| ६ | रात्री - ८.०० वा | दूध | दूध -३०० मिली | दूध -३०० मिली | + २०० मिली | + २०० मिली |

Medical Superintendent Cl. 1
Sub. District Hospital, [illegible]

Scanned with OKEN Scanner

## आहाराचा तपशिल

१) प्रत्येक रुग्णांस किमान ३०० मिली/कमाल ६०० मिली दुध देण्यात यावे.

२) बाल रुग्णांच्य गरजेप्रमाणे दलिया, सुजी, खिचडी, सातुपीठ, नाचणी पीठ, मिक्स डाळ यांचा आहारतज्ञांच्या सल्ल्यानुसार समावेश असावा.

३) गर्भवती माता, स्तनदा यांच्यासाठी अतिप्रथीनेयुक्त आहारात किमान २ अंडी छानापाणी यांचा दैनंदिन आहारात समावेश करावा.

४) पौढ रुग्णांसाठी किमान ३०० मिली दुध, गर्भवती माता व स्तनदा माता ( ५०० मिली ३०० + २०० मिली ) दुध देण्यात यावे.

५) सर्व पौढ रुग्णांना दैनंदिन आहारात १ फळ मिळणे आवश्यक आहे. ( गर्भवती व स्तनदा मातांना २ फळे देण्यात यावी. )

६) मधुमेह रुग्णांना मौसंबी देण्यात यावे बालरुग्णांना १ फळे देण्यात यावी.

७) शेंगदाणा लाडु बनविताना ४० ग्रॅम शेंगदाणा व ३० ग्रॅम गुळ वापरणे.

८) छानापाणी रुग्णांच्या गरजेनुसार देण्यात यावे.

९) सुप बनविण्यासाठी उसळी, डाळी, कडधान्य, फळभाजी, तेल यांचा वापर करावा.

१०) ताक आहार देतांना किमान ८०० मिली ताक बनविण्यासाठी दही पुरविण्यात यावे.

११) बालरुग्णांसाठी आहारामध्ये संध्याकाळी तांदुळ + भाज्या + डाळ यांचा खिचडी देण्यात यावी.

१२) पालेभाज्या, कंदभाज्या, इतर भाज्या यांचा आहारात नियमित समावेश करावा.

१३) दुधाची ॲलर्जी असल्यास सोयामील्क चा पर्याय देण्यात यावा.

१४) सदर आहार शासन निर्णय २३ एप्रिल २०१९ अन्वये प्रसिध्द केला आहे. तरी स्थानिक स्तरावर व आहारतज्ञांच्या सल्ल्यानुसार रुग्णांच्या आजारानुसार देण्यात यावा.

१५) दर तीन महिन्यांनी कंत्राटदारांनी आहार विभागातील कर्मचा.यांची वैदयियक तपासणी करुन घ्यावी.

१६) सर्व लहान मोठी भांडी कंत्राटदारांनी पुरविण्यात यावी.

१७) कंत्राटदाराने रुग्णांना बेड टू बेड आहार देण्यात यावा. सदर बाबत वॉर्ड इनचार्जने देखरेख करावी.

१८) आहारतज्ञांनी परीसेविके सोबत नियमित आहार वितरण व हाताळणी, स्वच्छता, नियमित वॉर्ड तपासणी करावी.

१९) कंत्राटदाराने प्रत्येक वॉर्डसाठी मोजमाप प्रमाणके पुरविण्यात यावीत.

२०) प्रत्येक महिन्याला कच्चा मालाची तपासणी आरोग्य प्रयोगशाळेकडून व्हावी. रोज उपयोगात येणा.या कच्चा मालाची गुणवत्ता आहार तज्ञांकडून तपासुन घ्यावी.

२१) रुग्णांना देण्यात येणारा आहार पोषक घटक व गुणवत्ता युक्त असणे आवश्यक आहे. उपरोक्त आहार व्यतिरिक्त काही नुसार आहारतज्ञांच्या सल्ल्याने आहारात बदल करण्यात यावा.

२२) रुग्णालया पुरविण्यांत येणारा आहार हा प्रति ताट रु.१४५/- मर्यादित असेल.

Medical Superintendent Cl. 1
Sub. District Hospital, Vengurla.

Scanned with OKEN Scanner

## अटी व शर्ती

१) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर संबधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवरच सादर करण्यात यावे.

२) दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्यांचा, बदल करण्याचा अथवा संख्यात्मक बदल करण्याचा अधिकार वैदयकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला जिल्हा सिंधुदूर्ग यांनी राखुन ठेवला आहे.

३)सदरील आहार पुरवठा हा पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च २०27 या कालावधी पर्यंत करावयाचा आहे. अथवा रज्यस्थरावरुन किंवा जिल्हा स्थरावरुन दरपत्रक कार्यरत राहिल. सदर सर्व करासह समावेशक दरपत्रक या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहे.

४) दरपत्रकात नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

५) दरपत्रकामध्ये खाडाखोड केल्याचे आढळल्यास दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.

६) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.

७) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर स्थानिक बाजारातील मान्यता प्राप्त संस्थांचाच विचार करण्यांत येईल.

८) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर संबंधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवर SGST/CGST/VAT/CST क्रमांक असणे आवश्यक आहे.

९) इच्छुक पुरवठाधारकांनी बाबनिहाय दरपत्रके मोहोरबंद लिफाप्यात सादर करावीत यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे त्यांचे नाव असावे.

१०) सर्व अन्न पदार्थाचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत.

११)दरपत्रक सादर करताना मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था नोंदणी दाखला (उदा. नगरपरिषद/ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाच्या पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

१२) पोस्टाने पाठविलेले दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

१३) अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल.

Medical Superintendent Cl. 1
Sub. District Hospital, Vengurla

नोटीस प्रसिद्ध दिनांक - ०७ /०४/२०२६
प्रसिद्धीचे स्थळ -
१) एनएचएम पोर्टल

Scanned with OKEN Scanner

# बंधपत्र

मी /आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करीतो की मी/ आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पूरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तींचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्राकातील अटी व शर्तींमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तींमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी / आम्ही दर पत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलनुसार अट १ ते १३ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ :

दिनांक :

Scanned with OKEN Scanner

(लेटरहेडवर देणेचे दरपत्रक नमुना)

प्रति,

मा. वैदयकिय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय वेंगुर्ला.

विषय : आहार सुविधा दरपत्रके सादर करणे बाबत.....

संदर्भ : सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे संकेत स्थळावर प्रसिध्य केलेली दरपत्रक सूचना पत्र क्र. ग्रारुदो/ भांडार / **आहार दरपत्रक/1041/२५ दिनांक :- २३/१२/२०२५**

महोदय,

संदर्भिय विषयानुसार मी/ आम्ही खालील काम करणेसाठी वाजवी दर देत आहोत.

| Sr. No. | Particulars | दर प्रति ताट ( सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| १ | रुग्णालयीन आहार सुविधा | |

सर्व कागदपत्राचे झेरॉक्स प्रतीवर स्वतः सही करून **साक्षांकीत** करावेत.

सोबत १) पॅन कार्ड झेरॉक्स

२) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

३) नोंदणी प्रमाणपत्र

४) बैंक खाते कॅन्सल चेक

आपला / आपली विश्वासू,

सील / शिक्का

Scanned with OKEN Scanner